C M Y K



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन..!

सायं.दैनिक

बीड किसान

www.beedkisan.in

• संपादक : शेख कामरान • BEED KISAN



बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३३३ ▪ मंगळवार, दि. १४ एप्रिल, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १५ एप्रिल, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-333 ▪ Tuesday 14 April, 2026 ▪ Postal Date 15 April, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# उद्धरली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे!







बीड – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बीड सह जिल्हाभरात अभिवादन करण्यासाठी जनसागर उसळल्याचे चित्र दिसून आले. जयंती निमित्ताने आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आ. संदीप क्षीरसागर, नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, एसडीएम कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, रिपाइं चे पप्पू कागदे, समता परिषदेचे अॅड. सुभाष राऊत, डॉ. योगेश क्षीरसागर, सभापती शेख निजाम तर परळी येथे आ. धनंजय मुंडे, अंबाजोगाई आ. नमिता मुंदडा, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, आष्टी आ. सुरेश धस, केज येथे खा. बजरंग सोनवणे अशा मान्यवरांसह भीम अनुयायांनी जिल्हाभरात विविध गावांमध्ये आणि शहरात महामानवाला अभिवादन करुन जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

## बीडची बारामती करण्याचे दादांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्राताईंचे प्रयत्न

### जिल्ह्याच्या विकासासाठी निधी मंजूर; विकासला मिळणार चालना



**बीड । किसान न्युज**

जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०२५–२६ या वर्षाकरिता विविध नाविन्यपूर्ण विकासकामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून, विद्यमान पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी या प्रकल्पांना प्रत्यक्ष गती दिली आहे. माजी पालकमंत्री अजित पवार यांनी आखलेल्या विकास आराखड्याची आणि बीडला बारामती करण्याच्या स्वप्नांची पूर्तता करण्याची जबाबदारी आता सुनेत्रा पवार यांनी समर्थपणे पेलली असून, जिल्हा प्रशासनाने कोट्यवधींचा निधी विविध लोकोपयोगी कामांसाठी वितरित केला आहे. या प्रक्रियेत कामांचा दर्जा सुनिश्चित करण्यासाठी १५ लाख रुपयांच्या किमान मर्यादेचा महत्त्वपूर्ण नियम लागू करण्यात आला आहे, ज्यामुळे छोट्या तुकड्यांऐवजी मोठे आणि दर्जेदार प्रकल्प उभे राहण्यास मदत होणार आहे. » पान २ वर

## हक्कासाठी एल्गार मुस्लिम आरक्षण मोर्चात उसळणार जनसागर!

**बीड । किसान न्युज**

**मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक हक्कांसाठी सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात जनसागर उसळणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. राज्य शासनाने रद्द केलेल्या ५ टक्के मुस्लिम आरक्षणाच्या निषेधार्थ हा भव्य मोर्चा येत्या १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.**

या मोर्चात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून हजारो नव्हे तर लाखो समाजबांधव सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. विशेषतः तरुणाई, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक यांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षवेधी ठरणार आहे. मोर्चात सहभागी होणारे आंदोलनकर्ते हातात फलक, बॅनर घेत शांतपने आपल्या हक्कासाठी ठाम आवाज उठवणार आहेत. आरक्षण आमचा हक्क आहे, शिक्षण आणि नोकरीत समान संधी द्या, अन्याय सहन करणार नाही अशा आशयाच्या फलकांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीचे प्रमुख अरबाज पठाण यांनी सांगितले की, मुस्लिम समाजाला शिक्षण आणि नोकरीच्या क्षेत्रात मागे टाकले जात असून, आरक्षण रद्द केल्याने समाजाच्या प्रगतीवर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे हा मोर्चा केवळ आंदोलन नसून आपल्या हक्कासाठीचा निर्णायक लढा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मोर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनही सतर्क झाले असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विशेष बंदोबस्त ठेवण्याची तयारी सुरू आहे. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्थेतही बदल करण्यात येण्याची शक्यता आहे. समाजातील विविध संघटना, राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या मोर्चाला पाठिंबा दर्शवला असून, एकजूट आणि संघटित शक्तीच हक्क मिळवून देऊ शकते असा विश्वास व्यक्त केला जात आहे. एकूणच, १७ एप्रिल रोजी होणारा हा एल्गार मोर्चा मुस्लिम समाजाच्या हक्कासाठीची मोठी ताकद दाखवणारा ठरणार असून, राज्य शासनाचे लक्ष वेधून घेणारा ऐतिहासिक क्षण ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



### अरबाज पठाण यांच्या हाकेने सकल मुस्लिम मावळे एकवटणार

**मुस्लिम समाजासाठी रद्द करण्यात आलेल्या ५ टक्के आरक्षणाच्या पुनर्स्थापनेसाठी १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणाऱ्या एल्गार मोर्चासाठी समाजात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या मोर्चात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी होणार असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर अरबाज पठाण यांनी दिलेल्या हाकेने सकल मुस्लिम समाज मोठ्या संख्येने एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे. हा मोर्चा केवळ आंदोलन नसून आपल्या हक्कासाठीचा एल्गार आहे. समाजातील प्रत्येक घटकाने एकजुटीने यात सहभागी व्हावे, असे आवाहन अरबाज पठाण यांनी केले आहे.**





## गेवराई येथील शिवस्मारकाचा मार्ग मोकळा; जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानंतर न.प.कडून कामाला गती

**गेवराई । किसान न्युज**

येथील नियोजित शिवस्मारकाचा प्रश्न आता मार्गी लागला असून, बीड जिल्हाधिकारी यांनी सदर स्मारक नियोजित जागेतच बसवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करत गेवराई नगरपरिषदेच्या वतीने नियोजित जागेवर चौथरा आणि इतर प्राथमिक कामांना सुरुवात करण्यात आली आहे.अनेक दिवसांपासून शिवस्मारकाच्या जागेवरून सुरू असलेल्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. बीड जिल्हा प्रशासनाने सर्व तांत्रिक बाबींची तपासणी करून ही जागा स्मारकासाठी योग्य असल्याचे शिक्कामोर्तब केले. बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयामुळे शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. गेवराई नगरपरिषदेने कामासाठी आवश्यक निधी आणि मनुष्यबळ » पान २ वर



## हायवाच्या धडकेत तरुणाचा बळी

**गेवराई । किसान न्युज**

बीड जिल्ह्यातील सिरसदेवी परिसरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या सुसाट हायवामुळे एका निष्पाप तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आहे. वाळू माफियांची दहशत आणि प्रशासनाचे याकडे होणारे दुर्लक्ष यावर संताप व्यक्त केला जात आहे.सिरसदेवी परिसरात वाळू माफियांच्या मुजोरपणाने पुन्हा एकदा एका निष्पाप जिवाचा बळी घेतला आहे. सिंदफना नदीपात्रातून अवैध वाळू घेऊन जाणाऱ्या एका भरधाव हायवाने दुचाकीला जोराची धडक दिली, ज्यामध्ये एका तरुणाचा जागीच अंत झाला. धक्कादायक बाब म्हणजे, हायवा चालक मद्यधुंद अवस्थेत होता आणि त्याने अपघातानंतर वाहन न थांबवता पळ काढण्याचा प्रयत्न केला. परिसरात रात्रंदिवस चालणाऱ्या या अवैध वाळू वाहतुकीमुळे सामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. प्रशासनाचे वाळू माफियांना अभय आहे की काय? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून चालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.




## जिल्ह्यात निघणार १०१ मिरवणुका!

**बीड (किसान न्युज):** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज बीड जिल्ह्यात भीमअनुयायांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत असून प्रशासनाने सोहळ्यासाठी जय्यत तयारी केली आहे. जिल्ह्यात एकूण १०१ ठिकाणी भव्य मिरवणुका निघणार असून सर्वाधिक मिरवणुका बीड, परळी आणि अंबाजोगाई शहरात आयोजित करण्यात आल्या आहेत. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था » पान २ वर

## मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाला मोठ्या संख्येने उपस्थित राहा : आर.एम.सेठ

### एक दिवस लेकरांच्या भविष्यासाठी द्यावा







**बीड । किसान न्युज**

**येथे मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चा शुक्रवारी (दि.१७) जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. या मोर्चाला जिल्ह्यातील मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आर.एम.सेठ यांनी केले. तसेच एकदिवस लेकरांच्या भविष्यासाठी द्यावा असेही त्यांनी सांगितले आहे. न्यायालयाने ५ टक्के शिक्षणात मुस्लिम आरक्षण मान्य केले होते. मात्र राज्य सरकारने हे आरक्षण रद्द केले आहे.**

याच्या निषेधार्थ आणि मुस्लिम समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण आवश्यक असल्याने मुस्लिम समाजाला आरक्षण द्यावे या मागणीसाठी मुस्लिम आरक्षण कृती समिती, सप्तरंग प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.१७) जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाची जिल्हाभरात तयारी सुरू असून, गावपातळीवर यासाठी बैठका सुरू असून, या बैठकांना मिळत असलेला प्रतिसाद पाहता हा एल्गार मोर्चा ऐतिहासिक ठरणार असे चित्र आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील प्रत्येकाने या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी आणि आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी एक दिवस वेळ काढून या मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सामाजिक क्षेत्रातील मोठे नाव असलेले आर.एम. सेठ यांनी केले आहे.


स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

✆ 9850643058

सोने २४ कॅरेट 152,000

२२ कॅरेट 145,000

चांदी प्रतिकिलो 242,000


## प्रशासनाची बैठक म्हणजे ठेवीदारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार : प्रा.उबाळे

### बैठका सुरू मात्र चर्चा, सूचना आणि कागदोपत्री निर्णय

**बीड । किसान न्युज**

जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या पतसंस्था आणि मल्टीस्टेट प्रकरणी लाखो ठेवीदारांचे पैसे अडकून पडले असताना, प्रशासनाकडून केवळ बैठकींचा फार्स सुरू आहे. दरवेळी नवी बैठक, नवे आश्वासन आणि प्रत्यक्षात शून्य कारवाई आहे. प्रशासनाकडून ठेवीदारांची थट्टा आहे असा आरोप ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा. सचिन भैय्या उबाळे यांनी केला आहे. प्रा. उबाळे म्हणाले की जिल्हाधिकारी कार्यालयात दिवाळखोरीत निघालेल्या पतसंस्था मल्टीस्टेट प्रकरणी सोमवारी पुन्हा एकदा आढावा बैठक पार पडली. मात्र या बैठकीतही नेहमीचा फॉर्म्युला चर्चा, सूचना आणि कागदोपत्री निर्णय यापलीकडे काहीच घडले नाही. याआधी झालेल्या तीन बैठकींचाही हाच परिणाम दिसून आला. त्यातही प्रत्यक्षात ठोस कारवाई झाली नाही. ज्ञानराधा, जिजाऊ, साईराम, राजस्थानीसह, अनेक पतसंस्था आणि मल्टीस्टेट प्रकरणांत ठेवीदारांची आयुष्यभराची कमाई अडकली आहे. या पार्श्वभूमीवर प्रा. उबाळे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत मोर्चा काढण्यात आला होता. दरम्यान मल्टीस्टेट प्रकरणी यापूर्वीही प्रशासनाने सलग तीन बैठका घेतल्या होत्या, मात्र प्रत्यक्षात ठोस कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही. आजच्या बैठकीत विविध विभागांचे अधिकारी, पोलीस अधिक्षक, जिल्हा निबंधक, आवसायक,उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी कायदेशीर कारवाईसह विविध सूचना दिल्या असल्या तरी त्या केवळ आदेशांपुरत्याच मर्यादित राहतात आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप प्रा. सचिन उबाळे यांनी केला.



## १ मे पासून बीडमध्ये राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

### शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञानाची मोठी पर्वणी

### विविध मान्यवरांच्या हस्ते होणार उद्घाटन; कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती

**बीड । किसान न्युज**

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, नव्या संशोधनाची माहिती आणि विविध कृषी उत्पादनांची ओळख व्हावी या उद्देशाने किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. याच परंपरेत यावर्षी प्रथमच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहावरून १ते ५ मे दरम्यान बीड येथे भव्य राज्यस्तरीय किसान कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल (मल्टी पर्पज ग्राउंड) बीड येथील विस्तीर्ण मैदानावर ५ दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक व कृषीभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे » पान २ वर



C M Y K